# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २२/११/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २२/११/२००६ रोजी सभा सुचना क्र. २१ दि. १७/११/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ५) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ६) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ७) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ९) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १०) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| ११) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १२) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ३) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ४) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग, मनपा कर्मचारी वर्ग, यांचे मी हार्दिक स्वागत करतो. ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी आशा बाळगतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी नगर सचिवांना सुचना करतो.

(नगरसचिव यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले)

**जयंत पाटील :-**

आजच्या सभेला प्रशासनाचे कोणीही अधिकारी नाहीत, मा. उपआयुक्त नाहीत. सभेमध्ये त्यांनी येणे आवश्यक असते. म्हणजे स्थायी समितीच्या बाबतीत त्यांच्या मनात जी भावना आहे, ती एवढ्या निगरगट्टपणे आहे. त्याचा आम्ही निषेध करतो आणि गेल्या मिटींगमध्ये सुध्दा त्यांना सुचना दिली होती की, तुम्ही वेळेवर या सर्व सदस्य व पिठासिन अधिकारी, सभापती हे सर्व वेळेवर येतात आणि इतर कोणीही अधिकारी इथे या सभेमध्ये हजर नाहीत. तेव्हा आजची सभा तहकुब करावी अशी मी आपणांस विनंती करतो.

**मा. सभापती :-**

आजची सभा तहकुब झाल्याचे मी जाहीर करतो.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सकाळी ११.१८ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**